01 DEC 2024
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# असीम निष्ठेतूनच शिवाजी महाराजांचे भव्य शिल्प

## शिल्पकार सीमा खेडकर-शिर्के : शिवाजी विद्यापीठात शिवछत्रपतींच्या पुतळ्याचा सुवर्ण महोत्सव

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : आपल्या कामावरील असीम निष्ठेमुळेच शिल्पकार बी. आर. खेडकर यांच्या हातून शिवाजी विद्यापीठासमोरील छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य, देखणे शिल्प तयार झाले, असे भावनिक उद्‌गार त्यांच्या कन्या तथा शिल्पकार सीमा खेडकर-शिर्के यांनी शनिवारी काढले.

विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्वारूढ पुतळ्याच्या अनावरणाचा सुवर्ण महोत्सव दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून त्या बोलत होत्या. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.

सीमा खेडकर-शिर्के म्हणाल्या, प्रथम कुलगुरू डॉ. अप्पासाहेब पवार आणि खेडकर यांच्या एकमेकांशी सातत्यपूर्ण चर्चेतून हे शिवरायांचे देखणे शिल्प साकारले. त्यावेळी हा पुतळा आशिया खंडातला सर्वांत मोठा म्हणून गणला गेला. खेडकरांनी ५०० हून अधिक पुतळे साकारले. ७१ व्या वर्षी त्यांना अर्धांगवायू झाला. त्यानंतरसुद्धा त्यांनी एका हाताने १५० पुतळे साकारले. सन २०२६ हे बी.आर. खेडकर यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. त्या निमित्ताने जानेवारी २०२५ मध्ये विद्यापीठात शिल्पकला कार्यशाळा भरविण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी पुतळा उभारण्यामागील प्रेरणा सांगितली.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, या पुतळ्याच्या उभारणीत कोल्हापूर जिल्ह्यातील भोगावती, दूधगंगा-वेदगंगा, कुंभी-कासारी, वारणा आणि पंचगंगा या पाच सहकारी साखर कारखान्यांच्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांचाही हातभार लागला आहे. दरवर्षी १ डिसेंबर हा दिवस या पुतळ्याचा अनावरण दिन म्हणून साजरा केला जाईल.

यावेळी पुतळ्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्ताने जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी संपादित केलेल्या विशेष माहिती पुस्तिकेचे प्रकाशन झाले. डॉ. अवनीश पाटील यांनी स्वागत केले. नंदिनी पाटील व धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले, तर कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. सरिता ठकार, डॉ. श्रीकृष्ण महाजन उपस्थित होते. शाहीर डॉ. आझाद नायकवडी त्यांच्या पोवाड्याने वातावरण शिवमय करून सोडले.



शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त पुतळ्याचे शिल्पकार बी.आर. खेडकर यांच्या कुटुंबीयांचा कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते शनिवारी सत्कार करण्यात आला.

### खेडकर यांच्या नऊ कन्यांचा एकत्र सत्कार

- शिल्पकार बी.आर. खेडकर यांना एकूण नऊ मुली आहेत.
- यामध्ये सीमा शिर्के-खेडकर, प्रतिभा औंधाळे, शोभा राजे, उज्ज्वला राजे, जयश्री भालेराव, अंजली पाषाणकर, प्रवीणा पुरेकर आणि तृप्ती पुरेकर यांचा समावेश असून, या सर्व भगिनींचा यावेळी सत्कार करण्यात आला.

01 DEC 2024
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कामावरील निष्ठेतूनच खेडकर यांच्या हातून शिवरायांचे भव्य शिल्प साकार

## सीमा खेडकर-शिर्के यांचे प्रतिपादन; शिवाजी विद्यापीठात शिवछत्रपतींच्या पुतळ्याचा सुवर्णमहोत्सव समारंभ

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

आपल्या कामावरील असीम निष्ठेमुळेच शिल्पकार बी. आर. खेडकर यांच्या हातून शिवाजी विद्यापीठासमोरील छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य, देखणे शिल्प तयार झाले, असे भावनिक उद्गार त्यांच्या कन्या तथा शिल्पकार सीमा खेडकर-शिर्के यांनी काढले. शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्वारूढ पुतळ्याच्या अनावरणाचा सुवर्णमहोत्सव दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त पुतळ्याचे शिल्पकार बी. आर. खेडकर यांच्या कुटुंबीयांचा विद्यापीठामार्फत विशेष सत्कार करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह मान्यवर. (छाया : पप्पू अत्तार)

सीमा खेडकर-शिर्के म्हणाल्या, विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार व खेडकर यांच्या एकमेकांशी सातत्यपूर्ण चर्चेतून शिवरायांचे हे देखणे शिल्प साकार झाले. गेली ५० वर्षे हा पुतळा दिमाखदारपणे उभा आहे, हेच खेडकर यांच्या शिल्पकलेचे मोठेपण आहे. आजच्या शिल्पकारांसाठी त्यांचे हे काम आदर्शवत आहे.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, डॉ. आप्पासाहेब पवार यांच्यासारख्या जाणकार इतिहासकाराची नजर व खेडकरांसारख्या कसलेल्या शिल्पकाराचे कसब यांचा संगम म्हणजे शिवछत्रपतींचा हा पुतळा आहे. लोकसहभागातून शिवरायांचा हा पुतळा उभा राहिल्याने त्याला वेगळे महत्त्व आहे. येथून पुढे दरवर्षी १ डिसेंबर हा दिवस या पुतळ्याचा अनावरण दिन म्हणून साजरा केला जाईल.

याप्रसंगी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी संपादित केलेल्या विशेष माहिती पुस्तिकेचे प्रकाशन झाले. जनसंपर्क कक्षाने निर्माण केलेली पुतळ्याची माहिती देणारी गीत व १५ मिनिटांची लघुचित्रफीत यांचे लोकार्पण ऑनलाईन पद्धतीने झाले. पुतळ्याच्या माहितीफलकाचे अनावरण करण्यात आले.

दरम्यान, शुक्रवारी सायंकाळीच पुतळ्यास शोभिवंत फुलांच्या माळांची आरास व पुतळा परिसराला आकर्षक विद्युत रोषणाई केली होती. इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविक केले. नंदिनी पाटील, धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. सरिता ठकार, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार उपस्थित होते.

### पोवाड्यामुळे वातावरण शिवमय...

शाहीर डॉ. आझाद नायकवडी यांच्या पोवाड्यांनी वातावरण शिवमय. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सुवर्णमहोत्सवी पुष्पांजलीनिमित्त ... उद्यानात शाहीर डॉ. आझाद नायकवडी व त्यांच्या साथीदारांनी छत्रपतींची स्वराज्य स्थापना त्याचबरोबर शिवाजी विद्यापीठातील शिवाजी महाराज पुतळा निर्मितीच्या इतिहासाचा पोवाडा सादर करून वातावरण शिवमय केले.

### खेडकर यांच्या नऊ कन्यांचा एकत्र सत्कार

शिल्पकार बी. आर. खेडकर यांना नऊ मुली आहेत. या समारंभाच्या निमित्ताने त्यांचा कुटुंबीयांसह शाल, श्रीफळ व शिवछत्रपतींच्या पुतळ्याची प्रतिकृती देऊन सत्कार करण्यात आला. यात सीमा शिर्के-खेडकर, प्रतिमा ओव्हाळे, शोभा राजे, उज्ज्वला राजे, जयश्री भालेराव, अंजली पावसकर, प्रवीणा पुरेकर आणि तृप्ती पुरेकर यांचा समावेश आहे.

01 DEC 2024 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कामावरील निष्ठेतूनच शिवरायांचे शिल्प साकार

## सीमा खेडकर-शिर्के : शिवाजी विद्यापीठात शिवछत्रपतींच्या पुतळ्याचा सुवर्णमहोत्सव

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कामावरील असीम निष्ठेमुळेच शिल्पकार बी. आर. खेडकर यांच्या हातून शिवाजी विद्यापीठासमोरील छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य, देखणे शिल्प तयार झाले, असे भावनिक उद्गार त्यांच्या कन्या तथा शिल्पकार सीमा खेडकर-शिर्के यांनी काढले. शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्वारूढ पुतळा अनावरणाचा सुवर्णमहोत्सव दिन विद्यापीठात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून त्या बोलत होत्या. पुतळा अनावरण सुवर्णमहोत्सव दिनाच्या पूर्वसंध्येला पुतळ्यास फुलांच्या माळांची आरास, तसेच परिसराला विद्युत रोषणाई केली होती.



कोल्हापूर : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त माहिती फलक अनावरणप्रसंगी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, सीमा खेडकर-शिर्के यांच्यासह मान्यवर.

सीमा खेडकर-शिर्के म्हणाल्या, विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार आणि खेडकर यांच्या एकमेकांशी सातत्यपूर्ण चर्चेतून हे शिवरायांचे शिल्प साकार झाले. त्यावेळी हा पुतळा आशिया खंडातील सर्वात मोठा म्हणून गणला गेला. ऊन, वारा, पाऊस झेलत गेली ५० वर्षे हा पुतळा दिमाखदारपणे उभा आहे, हेच खेडकर यांच्या शिल्पकलेचे मोठेपण आहे.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील म्हणाले, डॉ. आप्पासाहेब पवार हे द्रष्टे कुलगुरू आणि महान इतिहासकार होते. त्यांच्या मनात छत्रपती शिवरायांची विशिष्ट छबी होती. ती या पुतळ्याच्या माध्यमातून त्यांनी खेडकर यांच्याकरवी साकार करून घेतली.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, डॉ. आप्पासाहेब पवार यांच्यासारख्या जाणकार इतिहासकाराची नजर आणि खेडकरांसारख्या कसलेल्या शिल्पकाराचे कसब यांचा संगम म्हणजे शिवछत्रपतींचा हा पुतळा आहे. या पुतळ्याच्या उभारणीत भोगावती, दूधगंगा-वेदगंगा, कुंभी-कासारी, वारणा आणि पंचगंगा या पाच साखर कारखान्यांच्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांचाही हातभार लागला आहे.

यावेळी जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी संकलित व संपादित केलेल्या विशेष माहिती पुस्तिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. शाहीर डॉ. आझाद नायकवडी आणि त्यांच्या साथीदारांनी पोवाडा सादर केला. इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनिश पाटील यांनी प्रास्ताविक केले. नंदिनी पाटील व धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. सरिता ठकार, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार आदी उपस्थित होते.

### खेडकर यांच्या नऊ कन्यांचा एकत्र सत्कार

शिल्पकार बी. आर. खेडकर यांना नऊ कन्या आहेत. त्यांना या समारंभाच्या निमित्ताने आमंत्रित करण्यात आले आणि त्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये सीमा शिर्के-खेडकर, प्रतिभा ओव्हाळे, शोभा राजे, उज्वला राजे, जयश्री भालेराव, अंजली पाषाणकर, प्रविणा पुरेकर आणि तृप्ती पुरेकर यांचा समावेश होता.

### पुतळ्याच्या माहिती फलकाचे अनावरण

छत्रपती शिवाजी महाराजांच्या या पुतळ्याची माहिती देणाऱ्या फलकाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. विद्यापीठ परिसरात या माहिती फलकाची स्थापना करण्यात येणार आहे.

01 DEC 2024

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# निष्ठेतूनच खेडकरांच्या हातून शिवाजी महाराजांचे शिल्प साकार

## शिल्पकार सीमा खेडकर-शिर्के यांचे प्रतिपादन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त माहितीपुस्तिकेचे प्रकाशन करताना शिल्पकार सीमा खेडकर-शिर्के, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, परीक्षा संचालक डॉ. अजितसिंह जाधव, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. अवनिश पाटील.

प्रतिनिधी
कोल्हापूर

आपल्या कामावरील असीम निष्ठेमुळेच शिल्पकार बी.आर. खेडकर यांच्या हातून शिवाजी विद्यापीठासमोरील छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य, देखणे शिल्प तयार झाले, असे भावनिक उद्गार त्यांच्या कन्या तथा शिल्पकार सीमा खेडकर-शिर्के यांनी येथे काढले.

शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्वारूढ पुतळ्याच्या अनावरणाचा सुवर्णमहोत्सव दिन विद्यापीठात साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

सीमा खेडकर-शिर्के म्हणाल्या, खेडकर यांनी मोठी मेहनत व चिकाटीने शिवाजी विद्यापीठातील या शिवशिल्पाचे काम केले. सुरवातीला त्यांच्याकडे काम देण्याविषयी साशंक असणाऱ्या लोकांनीही हे काम पाहून त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली. विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार आणि खेडकर यांच्या एकमेकांशी सातत्यपूर्ण चर्चेतून हे शिवरायांचे देखणे शिल्प साकार झाले. त्यावेळी हा पुतळा आशिया खंडातला सर्वात मोठा म्हणून गणला गेला. ऊन, वारा, पाऊस झेलत गेली ५० वर्षे हा पुतळा दिमाखदारपणे उभा आहे, हेच खेडकर यांच्या शिल्पकलेचे मोठेपण आहे. आजच्या शिल्पकारांसाठी त्यांचे हे काम आदर्शवत स्वरुपाचे आहे. असे खेडकरांनी ५०० हून अधिक पुतळे साकारले. विशेष म्हणजे ७१ व्या वर्षी त्यांना अर्धांगवायू झाला. त्यानंतर सुद्धा त्यांनी एका हाताने १५० पुतळे साकारले. सन २०२६ हे बी.आर. खेडकर यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. त्या निमित्ताने जानेवारी २०२५मध्ये शिवाजी विद्यापीठात शिल्पकला कार्यशाळा भरविण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, डॉ. आप्पासाहेब पवार हे द्रष्टे कुलगुरू आणि महान इतिहासकार होते. त्यांच्या मनात छत्रपती शिवरायांची विशिष्ट छबी होती. ती या पुतळ्याच्या माध्यमातून त्यांनी खेडकर यांच्याकरवी साकार करून घेतली. खेडकरांनीही जीव ओतून काम केल्याने मूर्तीमध्ये जिवंतपणा उतरला. हा पुतळा अखिल महाराष्ट्राचे वैभव आणि प्रेरणास्थान आहे. अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, डॉ. आप्पासाहेब पवार यांच्यासारख्या जाणकार इतिहासकाराची नजर आणि खेडकरांसारख्या कसलेल्या शिल्पकाराचे कसब यांचा संगम म्हणजे शिवछत्रपतींचा हा पुतळा आहे. या पुतळ्याच्या उभारणीत कोल्हापूर जिल्ह्यातील भोगावती, दूधगंगा-वेदगंगा, कुंभी-कासारी, वारणा आणि पंचगंगा या पाच सहकारी साखर कारखान्यांच्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांचाही हातभार आहे, तर परिसरातील नागरिकांनीही निधी दिला आहे. दरवर्षी १ डिसेंबर हा दिवस या पुतळ्याचा अनावरण दिन म्हणून साजरा केला जाईल. विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी संकलित व संपादित केलेल्या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन व लघुपटाचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी सर्व अधिकारी, प्राध्यापक, विद्यार्थी, कर्मचारी उपस्थित होते.

01 DEC 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




कोल्हापूर : विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळ्याच्या अनावरणाचा सुवर्णमहोत्सव दिन शनिवारी साजरा करण्यात आला. यावेळी पुतळ्याचे शिल्पकार बी. आर. खेडकर यांच्या कुटुंबीयांचा विशेष सत्कार करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. (बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

# असीम निष्ठेमुळेच साकारले देखणे शिल्प

## सीमा खेडकर-शिर्के : विद्यापीठ प्रांगणातील शिवपुतळ्याच्या अनावरणाचा सुवर्णमहोत्सव दिन

**कोल्हापूर, ता. ३० :** 'कामावरील असीम निष्ठेमुळेच शिल्पकार बी. आर. खेडकर यांच्या हातून शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराजांचे देखणे शिल्प तयार झाले', असे भावनिक उद्गार त्यांच्या कन्या शिल्पकार सीमा खेडकर-शिर्के यांनी शनिवारी येथे काढले.

विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळ्याच्या अनावरणाचा सुवर्णमहोत्सव दिन शनिवारी साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

खेडकर-शिर्के म्हणाल्या, 'खेडकर यांनी मेहनत व चिकाटीने शिवशिल्पाचे काम केले. सुरुवातीला त्यांच्याकडे काम देण्याविषयी साशंक असणाऱ्या लोकांनीही हे काम पाहून त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली. पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार आणि खेडकर यांच्या एकमेकांशी सातत्यपूर्ण चर्चेतून शिवरायांचे देखणे शिल्प साकार झाले. ऊन, वारा, पाऊस झेलत गेली ५० वर्षे हा पुतळा दिमाखदारपणे उभा आहे, हेच खेडकर यांच्या शिल्पकलेचे मोठेपण आहे. खेडकरांनी ५०० हून अधिक पुतळे साकारले. विशेष म्हणजे ७१ व्या वर्षी त्यांना अर्धांगवायू झाला. त्यानंतर सुद्धा त्यांनी एका हाताने १५० पुतळे साकारले.'

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'डॉ. पवार यांच्यासारख्या जाणकार इतिहासकाराची नजर आणि खेडकरांसारख्या कसलेल्या शिल्पकाराचे कसब यांचा संगम म्हणजे शिवछत्रपतींचा हा पुतळा आहे. लोकसहभागातून शिवरायांचा हा पुतळा उभा राहिल्याने त्याला आणखी वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. येथून पुढे दरवर्षी १ डिसेंबर हा दिवस या पुतळ्याचा अनावरण दिन म्हणून साजरा केला जाईल.'

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, 'डॉ. पवार हे द्रष्टे कुलगुरू आणि महान इतिहासकार होते. त्यांच्या मनात छत्रपती शिवरायांची विशिष्ट छबी होती. ती पुतळ्याच्या माध्यमातून त्यांनी खेडकर यांच्याकरवी साकार करून घेतली.'

दरम्यान, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर संकलित व संपादित केलेल्या विशेष माहिती पुस्तिकेचे प्रकाशन झाले. इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविक केले.

### नऊ कन्यांचा एकत्र सत्कार

शिल्पकार बी. आर. खेडकर यांना एकूण नऊ मुली. त्यांचा कुटुंबीयांसह शाल, श्रीफळ व शिवछत्रपतींच्या पुतळ्याची प्रतिकृती देऊन सत्कार करण्यात आला. यात सीमा शिर्के-खेडकर, प्रतिभा ओव्हाळे, शोभा राजे, उज्ज्वला राजे, जयश्री भालेराव, अंजली पाषाणकर, प्रवीणा पुरेकर, तृप्ती पुरेकर यांचा समावेश होता.

# प्रत्येकाला न्यायासाठीच संविधानाचा स्वीकार

## डॉ. रविनंद होवाळ; संविधान अमृतमहोत्सव सप्ताहाचा समारोप

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारतीय संविधानाची मूल्य व्यवस्था ही आदर्श मूल्य व्यवस्था आहे. आपण फक्त अभिमान बाळगून चालणार नाही, तर प्रत्यक्षात कसे उतरवता येईल ते पाहणे आवश्यक आहे. देशातील प्रत्येक नागरिकाला न्याय मिळाला पाहिजे यासाठीच संविधानाचा स्वीकार केला आहे, असे प्रतिपादन पुणे येथील विचारवंत डॉ. रविनंद होवाळ यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक समावेशन अभ्यास केंद्र,



डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भारतीय संविधान अमृत महोत्सव सप्ताह समारोपप्रसंगी 'भारतीय संवैधानिक मूल्ये' विषयावर विशेष व्याख्यानात ते बोलत होते.

डॉ. होवाळ म्हणाले, मानवी जगाच्या लाखो वर्षांच्या इतिहासामध्ये जगातील कोणत्याही राजकीय व्यवस्थेने जगातील कोणत्याही मानवी समूहाला दिलेले नाही इतके मोठे अधिकारी संविधानाद्वारे प्राप्त झाले आहेत. प्राचीन भारतामध्ये लोकशाहीचे पाळेमुळे रूजलेली आहेत. त्यामुळेच आज आपण ७५ वर्षांचा कालावधी पाहू शकत आहोत. देशातील प्रत्येक नागरिकाला न्याय मिळाला पाहिजे यासाठी संविधानाचा स्वीकार केला आहे.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचे भाषण झाले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, विद्यापीठामधील अधिविभाग व महाविद्यालयांमध्ये संविधानाचे वाचन सुरू करावेत.

पोस्टर प्रदर्शन स्पर्धेमध्ये पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. मानव्यविद्या शास्त्र इमारतीच्या प्रांगणात राजाराम महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी संविधानावर आधारित पथनाट्याचे सादरीकरणे केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 DEC 2024
तरुण भारत

# संविधान म्हणजे जीवनाची प्रेरणाशक्ती


- अशोक चौसाळकर
- शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

संविधान ही भारतीयांच्या जीवनाची प्रेरणाशक्ती असून गेली ७५ वर्षे यशस्वीपणे टिकले आहे. यापुढेही संविधान टिकेल, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात आयोजित भारतीय संविधान अमृतमहोत्सव सप्ताहामध्ये 'भारतीय संविधानाचे आजच्या भारतासाठीचे महत्त्व' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. प्रकाश पवार होते.

डॉ. चौसाळकर म्हणाले, संविधानातील विचार हे देशातील जनतेला मान्य असल्यानेच त्यांचा समावेश राज्यघटनेत करण्यात आला. संविधानाचे तत्वज्ञान सामाजिक, आर्थिक व राजकीय चळवळींतून साकार झाले आहे. लोकमान्य टिळकांपासून ते महात्मा गांधी यांच्यापर्यंत भारतीय स्वातंत्र्याचे तत्त्वज्ञान अभिव्यक्त झाले. राजा राममोहन रॉय, महात्मा फुले यांच्यापासून ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापर्यंत सामाजिक चळवळींचे तत्त्वज्ञान आकारास आले. या साऱ्या चळवळींचे तत्त्वज्ञान संविधानामध्ये ग्रंथित झाल्याचे दिसते. समता, जगण्याचे स्वातंत्र्य व अभिव्यक्तीच्या अधिकाराचा सुवर्ण त्रिकोण राज्यघटनेने प्रदान केला आहे. संघर्ष, चळवळींशिवाय अधिकार प्राप्त होत नाहीत, न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार संविधानाने दिल्याचेही डॉ. चौसाळकर यांनी सांगितले. डॉ. प्रल्हाद माने यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ.सुखदेव उंदरे यांनी परिचय करून दिला. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले, तर मतीन शेख यांनी आभार मानले. यावेळी डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. चंद्रकांत लंगरे, डॉ. रविंद्र भणगे, डॉ. प्रकाश कांबळे, विलास सोयम आदी उपस्थित होते.




**कोल्हापूर : व्याख्यानात बोलताना ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 DEC 2021
लोकसत्ता

# लोकांच्या प्रेमादरास पात्र ठरल्यानेच संविधान यशस्वी - डॉ. चौसाळकर

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



संविधान विषयावरील विशेष व्याख्यानात बोलताना डॉ. अशोक चौसाळकर.

**कोल्हापूर :** संविधान ही भारतीय लोकांनी आपल्या जीवनाची प्रेरणाशक्ती मानली. हे संविधान लोकांच्या प्रेमादरास पात्र ठरल्यानेच गेली ७५ वर्षे यशस्वीपणे टिकले आणि यापुढेही टिकेल, असा विश्वास ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांनी शुक्रवारी येथे व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठात आयोजित भारतीय संविधान अमृतमहोत्सव सप्ताहामध्ये 'भारतीय संविधानाचे आजच्या भारतासाठीचे महत्त्व' या विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. प्रकाश पवार होते.

डॉ. चौसाळकर यांनी संविधानाची प्रस्तुतता मांडली. ते म्हणाले, संविधानाचे तत्त्वज्ञान हे सामाजिक, आर्थिक व राजकीय चळवळींतून साकार झाले आहे. लोकमान्य टिळकांपासून महात्मा गांधी यांच्यापर्यंत भारतीय स्वातंत्र्याचे तत्त्वज्ञान अभिव्यक्त झाले. राजा राममोहन रॉय, महात्मा फुले यांच्यापासून ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापर्यंत सामाजिक चळवळींचे तत्त्वज्ञान आकारास आले. या साऱ्या चळवळींचे तत्त्वज्ञान संविधानामध्ये ग्रंथित झाल्याचे दिसते. मार्गदर्शक तत्त्वांमधील अनेक तरतुदी या देशाच्या गेल्या दीडशे वर्षांच्या सुधारणांची परंपरा सांगणाऱ्या आहेत. संविधानातील या प्रेरक तत्त्वांद्वारेच भारतीय जनता प्रगती करते आहे.

डॉ. प्रकाश पवार म्हणाले, राज्यघटनेने भारतीय नागरिकांच्या जीवनात क्रांती घडवून आणली आहे. तिने लोकांना सामाजिक गुलामगिरीकडून मुक्त वातावरणात आणले आहे. देशातील समग्र सामाजिक, आर्थिक आणि वैचारिक परिस्थिती पालटण्यासाठी राज्यघटनेने बळ दिलेले आहे.

01 DEC 2024

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ कुस्तीत 'दत्त द्वारका'ला जनरल चॅम्पियनशिप




**कोगे :** इचलकरंजी (ता. हातकणंगले) येथील जयवंत महाविद्यालयाने व्यंकोबा मैदानावर घेतलेल्या शिवाजी विद्यापीठ विभागीय कुस्ती स्पर्धेमध्ये दत्त द्वारका महाविद्यालय वाकरेच्या खेळाडूंनी फ्री स्टाईल या कुस्तीत गुणानुक्रमे २३ गुण, तर ग्रीको रोमन कुस्तीत १३ गुण मिळवून महाविद्यालयाने दोन्ही क्रीडा प्रकारात प्रथम क्रमांक पटकावत सर्वसाधारण विजेतेपद मिळवले.

त्यातील फ्री स्टाईलमध्ये प्रणव पाटील (५७ किलो) तृतीय क्रमांक, अतुल चेचर (६१ किलो) मध्ये प्रथम क्रमांक, प्रथमेश चेचर (६५ किलो) तृतीय क्रमांक. धैर्यशील लोंढे (७९ किलो) तृतीय क्रमांक, विनायक वास्कर (८६ किलो), द्वितीय क्रमांक, मोहन पाटील (९२ किलो) प्रथम क्रमांक, तेजश मोरे (१२५ किलो) प्रथम क्रमांक. तसेच ग्रीक रोमन मध्ये माऊली टिपुगडे (६७ किलो) प्रथम क्रमांक, रोहित पाटील (७२ किलो) द्वितीय क्रमांक, ओंकार पाटील (८२ किलो) प्रथम क्रमांक पटकावले. या सर्व खेळाडूंची कराड येथे होणाऱ्या आंतरविभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या सर्व खेळाडूंना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष नवनाथ पोवार, सचिव, प्रा. रूपाली पोवार व महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 DEC 2024
सकाळ

# महिला वेटलिफ्टिंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाला विजेतेपद

कोल्हापूर, ता. ३० : गुंटूर (आंध्रप्रदेश) येथील आचार्य नागार्जुन युनिव्हर्सिटी येथे झालेल्या साऊथ वेस्ट झोन इंटर युनिव्हर्सिटी महिला वेटलिफ्टिंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ महिला संघाने एक सुवर्ण, एक रौप्य, एक ब्राँझ पदकासह सर्वसाधारण विजेतेपद मिळवले. खेळाडूंची निवड सेंट्रल युनिव्हर्सिटी ऑफ हिमाचल प्रदेश येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली.

यशस्वी खेळाडू असे : काजल सरगर (सुवर्ण), भूमिका मोहिते (रौप्य), निकिता कमलाकर (ब्राँझ), सरिता सावंत (चतुर्थ), राजनंदिनी आमणे (चतुर्थ), प्राजक्ता साळुंखे (पाचवी), साक्षी संदुगडे (सातवी), अपेक्षा ढोणे (आठवी), राजलक्ष्मी पवार (बारावी), स्नेहा आमणे (चौदावी). खेळाडूंना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. सी. पाटील, डॉ. व्हीन एन. शिंदे, डॉ. शरद बनसोडे यांचे मार्गदर्शन लाभले.




**कोल्हापूर :** आंध्रप्रदेशातील आचार्य नागार्जुन युनिव्हर्सिटी येथे झालेल्या वेटलिफ्टिंग स्पर्धेतील विजेत्या महिला संघाला गौरविताना मान्यवर.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 DEC 2024
पुण्यनगरी

# विद्यापीठाची परीक्षा : ४६ हजार विद्यार्थी उपस्थित

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर/नोव्हेंबर-२०२४ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा दि. २५ नोव्हेंबरपासून सुरू आहेत. शनिवारी विविध अभ्यासक्रमांच्या १८८ विषयांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध १८३ परीक्षा केंद्रावर पार पडल्या. या परीक्षांसाठी ४६ हजार ३८६ विद्यार्थी उपस्थित होते. या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. शनिवारी तीन जिल्ह्यातून एकूण २९ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आली. यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यात २१, सांगली जिल्ह्यात २ आणि सातारा जिल्ह्यात ६ गैरप्रकारांचा समावेश आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

01 DEC 2024

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षेला ४६ हजार ३८६ विद्यार्थी उपस्थित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर उन्हाळी सत्रातील



पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेला ४६ हजार ३८६ विद्यार्थी उपस्थित होते. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील संलग्न महाविद्यालयातील १८३ केंद्रावर बीए, बी.कॉम., बी.एस्सी., बीबीए, बीसीए, बीई, बी.टेक., बी.कॉम. (आयटी) सह विविध अभ्यासक्रमांच्या १८८ विषयांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने सुरळीतपणे पार पडल्या. कोल्हापूर (२१), सांगली (०२) व सातारा (०६) असे तीन जिल्ह्यांतून २९ गैरप्रकारांची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.